


॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

✻ सुविचार ✻
जीवन म्हणजे
पराकोटीचा आनंद होय.

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. १४ मे २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३५७ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


## SPOT NEWS

### १४ खरीप पिकांच्या एमएसपीत केली वाढ

● **नवी दिल्ली** – केंद्र सरकारने १४ खरीप पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत (एमएसपी) वाढ केली. केंद्रीय मंत्रिमंडळाने आज हा निर्णय घेतला. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. त्यात तांदळासाठी २४४१ रुपये एमएसपी निश्चित केला. मागच्या तुलनेत ७२ रुपये वाढविले. दरम्यान, तुरीच्या एमएसपीत ४५० रुपये, सोयाबीन ३८०, उडीद ४००, सूर्यफूलच्या एमएसपीत ६२२ रुपये वाढ केली. किमान आधारभूत किंमत म्हणजे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांसाठी मिळणारा हमखास भाव आहे. अगदी त्या पिकांचे बाजारभाव कमी असले तरीही ही किंमत किंवा दर दिला जातो. यामागील मुख्य उद्देश बाजारभावांमधील चढ-उतारांचा शेतक-यांवर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये आणि त्यांना त्यांच्या पिकांसाठी किमान किंमत सातत्याने मिळत राहावी, हा आहे. त्यानुसार भाताच्या किमतीत प्रतिक्किंटल ७२ रुपये, ज्वारी (संकरीत) ३२४, मालदांडी ३२४, बाजरी १२५, मका १० रुपये, मूग १२ रुपये, तीळ ५०० रुपये, भूईमूग २५४ रुपये, कापूस ५५७ रुपये वाढ केली. प्रत्येक हंगामापूर्वी सरकार सीएसीपी(कृषी खर्च आणि मूल्य आयोग)च्या शिफारशींवर आधारित किमान आधारभूत किंमत निश्चित करते. जर एखाद्या पिकाचे उत्पादन प्रचंड झाले तर बाजारातील किंमती कमी होण्याची शक्यता असते. अशा प्रसंगी एमएसपी त्या उत्पादनासाठी एक निश्चित किंमत म्हणून कार्य करते. थोडक्यात सांगायचे तर ही एक विमा पॉलिसीप्रमाणे काम करते, जी शेतकऱ्यांना किंमत कमी झाली तरी त्याचा परिणाम जाणवू देत नाही.

### जागतिक दबावाला झुगारून रशिया भारताच्या पाठीशी

● **नवी दिल्ली** – जागतिक राजकारणात वाढत्या दबावाच्या पार्श्वभूमीवर, रशियाने भारतासोबतचे आपले व्यापारी आणि धोरणात्मक संबंध अधिक दृढ करण्याचे संकेत दिले आहेत. जगातील कोणताही दबाव असला तरी, रशिया भारताचा तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा खंडित होऊ देणार नाही, असे महत्त्वपूर्ण विधान रशियन परराष्ट्र मंत्री सर्गेय लावरोव्ह यांनी केले आहे. यावेळी लावरोव्ह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाची मुक्तकंठाने स्तुती केली. इंधन पुरवठ्यामध्ये कोणताही अडथळा येणार नाही.

# पंतप्रधानांच्या ताफ्यात ५० टक्केच वाहने

## चौफेर टीकेनंतर निर्णय । अनेक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांकडून खर्चात कपात

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –

पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करावा आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, अशा जनतेला केलेल्या आवाहनांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पंतप्रधानांनी आपल्या अधिकृत ताफ्याचा आकार ५० टक्क्यांनी कमी केला आहे. याव्यतिरिक्त पंतप्रधानांनी ‘वर्क फ्रॉम होम’चे आवाहन केले आहे. खर्चात कपात करण्याची ही मोहीम आता भाजपाशासित राज्यांमध्येही जोर धरू लागली आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, राजस्थानचे मुख्यमंत्री भजन लाल शर्मा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांसारख्या नेत्यांनीही आपापल्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.



अलीकडील देशांतर्गत दौऱ्यांदरम्यान या उपाययोजनेची अंमलबजावणी करण्यात आली. वाहनांची एकूण संख्या कमी करण्यात आली असली तरीही आवश्यक सुरक्षा व्यवस्था एसपीजीच्या नियमावलीनुसार काटेकोरपणे कायम ठेवण्यात आली आहे. हैदराबादमध्ये दिलेल्या भाषणानंतर, गुजरात आणि आसामच्या दौऱ्यांदरम्यानही त्यांच्या ताफ्याचा आकार याच पद्धतीने कमी करण्यात आला होता. पंतप्रधानांनी अशीही सूचना दिली आहे की, जिथे जिथे शक्य असेल तिथे त्यांच्या ताफ्यामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश करण्यात यावा; मात्र यासाठी केवळ याच उद्देशाने कोणतीही नवीन वाहने खरेदी केली जाऊ नयेत, अशी अट त्यांनी घातली आहे.

इंधनाचा वाढता वापर आणि सध्याची जागतिक परिस्थिती लक्षात घेऊन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही एक मोठा निर्णय घेतला आहे. त्यांनी स्वत:च्या ताफ्याचा तसेच आपल्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या ताफ्यांचा आकार ५० टक्क्यांनी कमी करण्याचे तात्काळ निर्देश दिले आहेत. या ताफ्यांमधून सर्व अनावश्यक वाहने काढून टाकण्यात यावीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या अधिकृत ताफ्याचा आकारही कमी करण्यात आला असून, तो १३ वाहनांवरून घटून ८ वाहनांवर आला आहे. पुढील आदेश मिळेपर्यंत त्यांच्या सर्व शासकीय आणि अधिकृत दौऱ्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांच्या संख्येवर मर्यादा असतील, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या दौऱ्यांदरम्यान कोणत्याही प्रकारच्या वाहन-रॅलींचे आयोजन केले जाणार नाही.

राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी सरकारी खर्चाला कात्री लावण्यासाठी आणि इंधनाची बचत करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्र्यांनी आपल्या अधिकृत ताफ्यातील वाहनांची संख्या किमान पातळीवर ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. याव्यतिरिक्त त्यांनी अनावश्यक वाहनांचा वापर टाळण्याचे आवाहनही केले आहे.

## नीट पेपरफुटी प्रकरणी अहिल्यानगरसह देशभरातून ६ जणांना अटक

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –

वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी नीट २०२६ परीक्षा पेपरफुटीच्या सावटाखाली आली असून, या प्रकरणाचा तपास आता केंद्रीय अन्वेषण विभागाने अत्यंत वेगाने सुरू केला आहे. या प्रकरणी आतापर्यंत देशभरातून एकूण ६ मुख्य आरोपींना अटक करण्यात आली असून, यात महाराष्ट्रातील नाशिक आणि अहिल्यानगरमधील तरुणांचा समावेश आहे.

सीबीआयने जयपूर, गुरुग्राम, नाशिक आणि अहिल्यानगर अशा विविध ठिकाणांहून अनेक आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत त्यात शुभम खैरनार (नाशिक) हा बीएएमएसच्या तिसऱ्या वर्षात शिकणारा शुभम हा या साखळीतील महत्त्वाचा दुवा मानला जात आहे. धनंजय लोखंडे (अहिल्यानगर/राहुरी) पुण्यात वास्तव्यास असताना यानेच शुभमला कुरिअरद्वारे प्रश्नपत्रिका पोहोचवली होती. मांगीलाल बिवाल, विकास बिवाल आणि दिनेश बिवाल (जयपूर) हे राजस्थानमधील वितरणाचे जाळे या कुटुंबाने हाताळल्याचा संशय आहे. यश यादव (गुरुग्राम) याचा हरियाणामधील व्यवहारांमध्ये याचा मोठा सहभाग समोर आला आहे.

तपासात असे उघड झाले आहे की, धनंजय लोखंडे याने कुरिअरद्वारे प्रश्नपत्रिका शुभम खैरनारला पाठवली. शुभमने ही प्रश्नपत्रिका १० लाख रुपयांना विकत घेतली होती. त्यानंतर शुभमने करिअर कौन्सिलिंगच्या नावाखाली टेलिग्राम ग्रुपचा वापर करून ही प्रश्नपत्रिका हरियाणातील मध्यस्थांना १५ लाख रुपयांना विकली. ही साखळी पुढे राजस्थानपर्यंत पोहोचली, जिथे एका ‘गेस पेपर’च्या नावाने त्याचे वितरण करण्यात आले.

मुख्य आरोपी शुभम खैरनार याच्या नाशिकमधील भाड्याच्या घरावर आणि नांदगावमधील मूळ घरावर सीबीआयने छापे टाकले. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या झडतीत मोबाईल फोन, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक पुरावे जप्त करण्यात आले आहेत. शुभमच्या कुटुंबाची गुन्हेगारी पार्श्वभूमी देखील तपासली जात असून, त्याच्या भावालाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले होते (मात्र नंतर सोडून दिले). केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने आणि ‘एनटीए’ने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

## राज्यातील मंत्र्यांसह अधिकाऱ्यांचे परदेश दौरे रद्द

● **मुंबई । वीरभूमी** –

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी सात महत्त्वाच्या घोषणा केल्या आणि देशभरात खळबळ उडाली. ज्यामध्ये प्रामुख्याने पेट्रोल-डिझेलचा मर्यादित वापर, वर्क फ्रॉम होमला प्राधान्य, सोन्याची खरेदी टाळणे आणि स्थानिक उत्पादनांचा (स्वदेशी) वापर वाढवण्यावर भर दिला आहे. तर किमान वर्षभर नागरिकांनी सोने खरेदी करू नये, असे आवाहनही मोदींकडून करण्यात आले आहे. त्याशिवाय, परदेश दौरे करू नका, पेट्रोल, डिझेलचा वापर कमी करा, असेही आवाहन पंतप्रधानांकडून करण्यात आले आहे. ज्यानंतर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील मंत्री आणि अधिकाऱ्यांसाठी काही मोठे निर्णय घेतले आहेत. मोदींच्या आवाहनानंतर आता फडणवीसांनी विविध अभ्यासासाठी आणि कामासाठी परदेशात जाणारे मंत्री आणि अधिकारी यांचे दौरे रद्द करण्याचे निर्देश दिले आहेत.

पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला आहे. परकीय चलन वाचवण्यासाठी आणि प्रशासकीय खर्च कमी करण्यासाठी विविध सरकारी कामांसाठी किंवा अभ्यासासाठी परदेशात जाणाऱ्या मंत्री आणि अधिकाऱ्यांचे दौरे रद्द केले आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, यापुढे कोणत्याही तातडीच्या कामाशिवाय परदेश प्रवासाला परवानगी दिली जाणार नाही, असे संकेतही देण्यात आले आहेत.

## आश्वी परिसरात अवकाळीसह वादळाचे थैमान

● **संगमनेर । वीरभूमी** –

आश्वी आणि पंचक्रोशीत काल बुधवारी (दि. १३) सायंकाळी अवकाळी पावसाने अक्षरशः थैमान घातले. मान्सूनपूर्व जोरदार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, शेतकऱ्यांसह व्यापारी वर्गालाही मोठा आर्थिक फटका बसला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून परिसरात ४१ अंशांपर्यंत तापमान नोंदवले जात होते. बुधवारी सकाळपासूनच प्रचंड उकाडा आणि आर्द्रता जाणवत होती. सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास अचानक वातावरणात बदल झाला आणि ढगांच्या कडकडाटासह मुसळ धार पावसाला सुरुवात झाली. सुमारे दीड तास सुरू असलेल्या पावसामुळे परिसर जलमय झाला.

वादळी वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की, आश्वी दाढ रस्त्यावरील विश्रामगृहाजवळील भलेमोठे लिंबाचे झाड उन्मळून थेट रस्त्यावर कोसळले. त्यामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. आश्वी बुद्रुक येथील चावडीजवळ जुन्या लिंबाच्या झाडाची मोठी फांदी दुचाकीवर कोसळल्याने वाहनाचे नुकसान झाले. आश्वी खुर्द, उंबरी बाळापूर, शेडगाव, पिंप्री लौकी अजमपूर, दाढ खुर्द, निमगाव जाळी आणि मांची परिसरात मोठ्या प्रमाणावर झाडे उन्मळून पडली.

आश्वी खुर्द येथे विजेचे खांब तुटून रोहित्र कोसळल्याची माहिती मिळाली आहे. ग्रामपंचायत आणि अनेक घरांवरील सोलर पॅनलचे नुकसान झाले असून स्टेट बँक ऑफ इंडिया चा टॉवरही कोसळला. वादळामुळे अनेक नागरिकांच्या घरांचे व मालमत्तेचे नुकसान झाले आहे. आश्विन मुथ्था यांच्या घरासमोरील झाड कोसळले, तर ज्ञानदेव ताजणे यांच्या वस्तीवरील सुमारे ३०० वर्ष जुने वडाचे झाड उन्मळून पडले. अनिस शेख यांच्या घरावर आणि शेजारी उभ्या असलेल्या वाहनावर शंभर वर्ष जुने झाड कोसळल्याने मोठे नुकसान झाले आहे.

# नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाचे अनावरण

## मुख्यमंत्र्यासह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती । त्रिशूळ, गोदावरी आणि त्र्यंबकेश्वर परंपरेचा संगम

● **मुंबई । वीरभूमी** –

पुढील वर्षी होऊ घातलेल्या नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आले. या बोधचिन्हात त्रिशूळ, गोदावरी आणि त्र्यंबकेश्वर परंपरेचा संगम आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार उपस्थित होते.

कुंभमेळ्याच्या लोगोसाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुमारे तीन हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धकांमधून तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक पटकावलेल्या पुणे येथील सुमित काटे यांना तीन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या नोएडा येथील मयांक नायक यांना दोन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या पंढरपूर येथील पीयुष पिंपळनेरकर यांचा एक लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

अश्विनी प्रसून जोशी, देशपांडे, मंदार राणे, वृषाली केकणे (देशमुख), बारिश दाते, विनय नारंग, डॉ. प्राजक्ता बास्ते, प्रफुल्ल सावंत, डॉ. दिनेश वैद्य, अँथनी लोपेझ आणि डॉ. किरण शिंदे यांसारख्या दिग्गज डिझाइन तज्ज्ञांच्या समितीने या प्रवेशिकांचे परिक्षण केले. सर्जनशीलता, नाविन्य, ब्रँड सुसंगतता आणि सादरीकरण या निकषांवर आधारित ही निवड करण्यात आली. या समितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी प्रास्ताविकाद्वारे कुंभमेळा आयोजन आणि लोगो स्पर्धेबाबत माहिती दिली.

यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध आखाड्यांचे साधू, संत उपस्थित होते.

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, ‘मायगव्ह’ आणि ‘असोसिएशन ऑफ डिझाइनर्स ऑफ इंडिया’ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या देशव्यापी डिझाइन स्पर्धेतून या बोधचिन्हाची निवड करण्यात आली. २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत मायगव्ह प्लॅटफॉर्मवर पार पडलेल्या या स्पर्धेत ७० आंतरराष्ट्रीय स्पर्धकांसह एकूण ३,०६७ प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या. हे बोधचिन्ह नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या पवित्र भूगोल आणि धार्मिक परंपरांवर आधारित आहे.




भगवान शंकराचे त्रिशूळ : आध्यात्मिक उर्जेचे प्रतीक.

त्र्यंबकेश्वर मंदिर: प्रादेशिक घडवणारी वारशाचे दर्शन मंदिराची प्रतिकृती.

काळाराम मंदिराची कमान आणि गोदावरी नदी : गोदावरी नदीला शिवलिंगाच्या रूपात दर्शविण्यात आले असून, ते कुंभमेळ्यातील पवित्र स्नानाच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित करते.

SPOT NEWS

## छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीस्थळी स्वच्छता अभियान

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत स्वच्छतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम तुळापूर येथे राबविण्यात आला. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीस्थळी स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. पुणे जिल्ह्यातील तुळापूर येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीस्थळी उपस्थित राहून कार्यकर्त्यांनी प्रथम महाराजांना अभिवादन केले. त्यानंतर समाधी परिसर, परिसरातील सार्वजनिक जागा तसेच परिसरातील स्वच्छतेचे काम हाती घेत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमाद्वारे इतिहासाचे जतन, स्वच्छतेचे महत्त्व आणि सामाजिक जबाबदारी पटवून देण्यात आली. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, अशोक भालके, संदीप डोंगरे, ऋषीकेश चव्हाण यांच्यासह विविध सामाजिक कार्यकर्ते आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित युवकांनी 'स्वच्छता हीच खरी सेवा' हा संदेश देत परिसर स्वच्छ ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच रांजणगाव (जि. पुणे) येथील प्रसिद्ध गणपती मंदिरात दर्शन घेण्यात आले. मंदिर परिसरातही स्वच्छतेबाबत जनजागृती करत नागरिकांना सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्याची शपथ देण्यात आली. संस्थेच्या वतीने अशा प्रकारचे सामाजिक, ऐतिहासिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबविले जात असून भविष्यातही समाजप्रबोधनासाठी विविध उपक्रम घेण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. पै. नाना डोंगरे म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज हे पराक्रम, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त केवळ अभिवादन करून थांबणे पुरेसे नाही, तर त्यांच्या विचारातून समाजासाठी काहीतरी विधायक करण्याची प्रेरणा घेणे आवश्यक आहे. स्वच्छता ही केवळ सरकारी मोहीम नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. समाधीस्थळी स्वच्छता अभियान राबवून इतिहासाबद्दलचा आदर आणि समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी व्यक्त करत आहोत.


## पाथर्डी येथे मुलांसाठी 'सनातन संस्कार प्रशिक्षण वर्गा'चे आयोजन

**● पाथर्डी । वीरभूमी–**

आजच्या धावपळीच्या युगात आपली मुले सुसंस्कारित, नैतिक मूल्यांची जोपासना करणारी आणि गुणसंपन्न व्हावीत, या उद्देशाने पाथर्डी येथे 'सनातन संस्कार प्रशिक्षण वर्गा'चे आयोजन करण्यात आले आहे. सनातन संस्था आणि मंदिर महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने हा स्तुत्य उपक्रम राबविला जात आहे. हा संस्कार वर्ग १० मे ते १४ मे या कालावधीत श्रीकृष्ण मंदिर, चिंचपूर रोड येथे आयोजित करण्यात आला असून, दररोज सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत संस्कार प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षण वर्गाची वैशिष्ट्ये म्हणजे या वर्गामध्ये ९ ते १५ वयोगटातील मुलांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात आहे. विविध विषयावर मार्गदर्शन केले जात असून त्यामध्ये प्रामुख्याने सुसंस्कार आणि नैतिक मूल्ये: मुलांमध्ये लहानपणापासूनच चांगल्या सवयी आणि नैतिकतेची रुजवण करणे गुणसंवर्धन: मुलांमधील सुप्त गुणांना वाव देऊन त्यांचे संवर्धन करणे. व्यक्तिमत्व विकास: सनातन संस्कारांच्या माध्यमातून मुलांचा आत्मविश्वास वाढवून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे. यावर भर दिला जात आहे.

# हळदीच्या दिवशीच राजूरमध्ये बालविवाह रोखला

**प्रशासन, पोलिस व सामाजिक संस्थांची तातडीची कारवाई । वधू-वर व पालकांना बालकल्याण समितीसमोर हजर राहण्याचे आदेश**



**● अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील माळेगाव येथील अल्पवयीन मुलगी आणि तिरडे येथील ३१ वर्षीय इसम यांचा आज राजूर येथे होणारा बालविवाह प्रशासन, पोलिस, सामाजिक संस्था आणि कार्यकर्त्यांच्या सतर्कतेमुळे थांबविण्यात आला. संबंधित वधू-वर आणि त्यांच्या पालकांना दोन दिवसांत जिल्हा बालकल्याण समितीसमोर उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

राजूर येथील अक्षय साई लॉन्स येथे आज दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास हा विवाह होणार असल्याची माहिती सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांनी प्रशासन आणि पोलिसांना दिली. माहिती मिळताच प्रशासन आणि पोलिसांनी तातडीने मंगल कार्यालयात धाव घेतली. त्यावेळी हळदीचा कार्यक्रम सुरू होता.

प्रशासनाने वधू-वरांच्या नातेवाईकांना बोलावून वधूचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असल्याने हा विवाह कायद्याने करता येणार नसल्याचे स्पष्ट केले. तसेच बालविवाह केल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही देण्यात आला. बालविवाहाचे दुष्परिणाम समजावून सांगत मुलीचे वय पूर्ण झाल्यानंतरच विवाह करण्याचे आवाहन प्रशासनाने केले.

यानंतर मंगल कार्यालयाच्या मालकालाही पाचारण करण्यात आले. वधू-वरांचे वयाचे दाखले न तपासता कार्यक्रमास परवानगी दिल्याबद्दल त्यांच्यावरही कारवाई होऊ शकते, असे प्रशासनाने बजावले. त्यानंतर तातडीने सर्व विवाहसोहळा थांबविण्यात आला.

उपस्थित वऱ्हाडी मंडळींनी केवळ भोजन करून विवाह न करता मंगल कार्यालय रिकामे केले. त्यानंतर वधू, वर आणि दोन्ही पालकांकडून राजूर पोलिस ठाण्यात मुलीचे वय पूर्ण होईपर्यंत विवाह करणार नसल्याचा लेखी जबाब घेण्यात आला. तसेच त्यांना दोन दिवसांत अहिल्यानगर येथील बालकल्याण समितीसमोर उपस्थित राहून बाँड लिहून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

हा बालविवाह रोखण्यात आल्यानंतर तालुक्यात मोठी खळबळ उडाली असून बालविवाह करणाऱ्यांना प्रशासनाने मोठा इशारा दिल्याची चर्चा सुरू आहे.

या कारवाईत राजूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक किशोर पवार, राजूर ग्रामपंचायतीचे अधिकारी हेमंत हंगेकर, अंगणवाडी सेविका नंदाताई देशमुख, पोलिस कॉन्स्टेबल सचिन शिंदे व दत्ता परते यांनी सहभाग घेतला.

### ५५ बालमातांच्या प्रकरणानंतर प्रशासन 'ॲक्शन मोड'मध्ये

■ तालुक्यातील ५५ बालमातांच्या प्रकरणाची चौकशी सुरू असतानाच अकोले तालुक्यात बालविवाहाचे प्रकार समोर येत आहेत. त्यामुळे प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष दिले असून, बालविवाह आढळल्यास तातडीने गुन्हे दाखल करण्याचे आदेश वरिष्ठ स्तरावरून देण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

अकोले तालुक्यात काही दिवसांपूर्वी बालविवाह प्रतिबंधासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विविध माध्यमांतून जनजागृती आणि प्रबोधन सुरू असतानाही बालविवाहाच्या घटना समोर येत असल्याने प्रशासनाने आता अधिक कठोर भूमिका घेण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**– श्रीनिवास रेणुकादास,**
अशासकीय सदस्य, अकोले तालुका बाल संरक्षण समिती, अकोले

## चेक बाऊन्स प्रकरणी पारनेर ग्रामीण पतसंस्थेच्या कर्जदारास तीन महिन्यांची शिक्षा

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून वाहन तारणावर घेतलेल्या कर्जाची परतफेड न करता दिलेला धनादेश अनादरित झाल्याप्रकरणी अहमदनगर येथील न्यायालयाने कर्जदार कैलास मारुती भोसले यांना तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच फिर्यादी पतसंस्थेला ९ लाख २७ हजार ४४९ रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी कैलास मारुती भोसले यांनी पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून वाहन तारण कर्ज घेतले होते. संबंधित कर्जाच्या परतफेडीसाठी त्यांनी पतसंस्थेला धनादेश दिला होता. मात्र, हा धनादेश बँकेत सादर केल्यानंतर अनादरित झाला. त्यानंतरही आरोपीने मुदतीत कर्जाची परतफेड न केल्याने पतसंस्थेने अहमदनगर येथील मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयात निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट क्ट कलम १३८ अंतर्गत एससीसी केस क्रमांक ६१२६/२०२४ दाखल केली होती.

सदर प्रकरणाची गुणदोषांवर सुनावणी झाल्यानंतर माननीय न्यायाधीश जी. जी. सोनी यांनी आरोपी कैलास भोसले यांना दोषी ठरवत तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच फिर्यादी संस्थेला ९ लाख २७ हजार ४४९ रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले.

न्यायालयाच्या आदेशानुसार, निकालाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत नुकसानभरपाईची रक्कम न भरल्यास आरोपीस अतिरिक्त सहा महिन्यांचा साधा कारावास भोगावा लागणार आहे.

या प्रकरणात फिर्यादी पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने ॲड. युवराज पाटील आणि ॲड. गणेश दरेकर यांनी कामकाज पाहिले.

## दिव्यांग बांधवांना दिव्यांग निधीचे वाटपासाठी लाभार्थ्यांनी १८ मे पूर्वी अर्ज सादर करावेत

**कोपरगाव पालिकेच्या गटनेत्या गौरी पहाडे यांचे आवाहन**

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने शहरातील दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही दिव्यांग कल्याण निधीचे वितरण करण्यात येणार आहे. नगरपरिषदेच्या या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ शहरातील जास्तीत जास्त पात्र दिव्यांग व्यक्तींनी घ्यावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेत्या गौरी पहाडे यांनी केले आहे.



नगरपालिका प्रशासनाच्या नियमानुसार पालिकेच्या एकूण उत्पन्नापैकी ५ टक्के निधी हा दिव्यांग व्यक्तींच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी राखीव ठेवण्यात येतो. या निधीच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांना त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणींवर मात करण्यासाठी थेट अर्थसहाय्य केले जाणार आहे.

या योजनेअंतर्गत दिव्यांग व्यक्तींना स्वतः चा छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवल, शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, वैद्यकीय उपचारांसाठी मदत तसेच आवश्यक सहायक उपकरणे खरेदी करण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांकडे किमान ४० टक्क्यांहून अधिक दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच संबंधित लाभार्थी कोपरगाव नगरपरिषद हद्दीतील कायमस्वरूपी रहिवासी असणे बंधनकारक आहे.

पात्र दिव्यांग बांधवांनी आपले आधार कार्ड, दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र आणि बँक पासबुकची झेरॉक्स प्रत नगरपालिकेच्या संबंधित विभागाकडे १८ मेपर्यंत जमा करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील प्रत्येक घटकापर्यंत विकास पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शहरातील कोणतीही पात्र दिव्यांग व्यक्ती या योजनेपासून वंचित राहू नये, ही आमची प्रामाणिक भावना आहे. त्यामुळे सर्व पात्र दिव्यांग बांधवांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन गटनेत्या गौरी पहाडे यांनी केले आहे. दिव्यांग बांधवांना कोणत्याही प्रकारची अडचण भासल्यास आमदार आशुतोष काळे यांच्या संपर्क कार्यालयाशी किंवा ९९२२३१०००४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले.

# अहिल्यानगरमध्ये महिलेची फसवणूक करणाऱ्या भोंदूबाबाला अटक

**गुप्तधनाच्या आमिषाने ५० हजारांची फसवणूक । घर पाडण्यास भाग पाडून आघोरी विधी करण्यात आल्याचा आरोप**

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरातील सर्जेपुरा परिसरात गुप्तधन मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका भोंदूबाबाने महिलेसह तिच्या कुटुंबाची ५० हजार रूपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एवढेच नव्हे तर संबंधित कुटुंबाला स्वतः चे घर पाडण्यास भाग पाडून आघोरी विधी करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात कथित भोंदू बाबाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी या भोंदूबाबाला अटक केली आहे.

शिव आण्णासाहेब सोनवणे (वय २३ रा. रंगभवनजवळ, सर्जेपुरा) असे त्या भोंदूबाबाचे नाव असून त्याला अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने त्याला तीन दिवसांची (१६ मेपर्यंत) पोलीस कोठडी दिली आहे. याबाबत सोनाली महेश काळोखे (वय २२, रा. रंगभवनजवळ, सर्जेपुरा) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिलेचे पती महेश काळोखे हे मजुरीचे काम करतात. त्यांचे कुटुंब सर्जेपुरा परिसरात वास्तव्यास आहे.

फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांच्या पतीचा मामाचा मुलगा शिव सोनवणे हा परिसरात आघोरी बाबा म्हणून परिचित असून तो अंधश्रध्दा, भोंदूगिरी आणि जादूटोण्याचे प्रकार करत असल्याची माहिती आहे. फिर्यादींचे वडिलोपार्जित घर हे शिव याच्या घरामागे असून त्या जागेखाली गुप्तधन असल्याचे शिव याने सांगितले. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी शिव हा फिर्यादींच्या घरी आला. त्याने तुमच्या घराखाली सोने असून माझ्या आघोरी विद्येच्या साहाय्याने ते बाहेर काढून देतो, असे सांगून त्यासाठी जादूटोण्याच्या साहित्याकरिता ५० हजार रूपये लागतील, असे सांगितले. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून फिर्यादींच्या कुटुंबाने ६ फेब्रुवारी रोजी त्याला रोख ५० हजार रूपये दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर शिव याच्या सांगण्यावरून संबंधित कुटुंबाने स्वतःचे घर पाडले.

फेब्रुवारी महिन्यात मध्यरात्री शिव याने त्या जागेवर कथित आघोरी विधी केल्याचा आरोप आहे. यावेळी लिंबू, मानवी कवटी, हाडे, हळद-कुंकू, भस्म आदी साहित्य मांडून मोठ्याने मंत्रोच्चार करण्यात आले. त्यानंतर जागा खोदण्यास सांगण्यात आले; मात्र तेथे कोणतेही गुप्तधन मिळाले नाही.

यानंतर फिर्यादींना संशय आल्याने त्यांनी शिव कडे ५० हजार रूपये परत मागितले. सुरूवातीला विधीच्या साहित्यावर पैसे खर्च झाले असे सांगून त्याने वेळकाढूपणा केल्याचे सांगण्यात आले. अखेर ११ मे २०२६ रोजी शिव याने मी पैसे परत देणार नाही. ही जागा आता माझी आहे. माझ्या नादी लागलात तर आघोरी प्रयोग करून संपवून टाकीन, अशी धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

दरम्यान, यासंदर्भात काळोखे कुटुंबाने पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर त्याची चौकशी करून मंगळवारी (१२ मे) रात्री उशिरा गुन्हा दाखल करून भोंदूबाबा शिव सोनवणे याला अटक करण्यात आली. पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ अधिक तपास करीत आहेत.

शिव सोनवणे हा परिसरात आघोरी बाबा म्हणून परिचित असून तो अंधश्रध्दा, भोंदूगिरी आणि जादूटोण्याचे प्रकार करत असल्याची माहिती आहे. पोलिसांनी त्याच्याकडील मोबाईल जप्त केला असून यामध्ये जादूटोणा केल्यासंदर्भातील अनेक व्हिडीओ आहेत. तसेच सर्जेपुरा, रामवाडी, सिध्दार्थनगर परिसरातील अनेक लोक शिव सोनवणे याच्याकडे जात होते. तो अंधश्रध्दा, भोंदूगिरी व जादूटोणा करून लोकांकडून पैसे उकळीत असल्याचा आरोप आहे.

दरम्यान, यासंदर्भात सुरूवातीला महेश भास्कर काळोखे (वय २९) यांच्या फिर्यादीवरून चौघांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात मंगळवारी (१२ मे) गुन्हा दाखल करण्यात आला होता. यामध्ये शिव सोनवणे याच्यासह ओम आण्णासाहेब सोनवणे, कोहिनुर आण्णासाहेब सोनवणे (सर्व रा. रंगभवन) व यश सागर सोळशे (रा. बोल्हेगाव) यांचा संशयित आरोपी म्हणून समावेश आहे. जमिनीच्या विक्रीच्या वादातून संशयितांनी फिर्यादीच्या कुटुंबावर हल्ला करून मारहाण केल्याचा आरोप आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## प्रा. अशोक मोरे यांना पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी

**पारनेर । वीरभूमी-**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पारनेर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचे इंग्रजी विभागप्रमुख प्रा. अशोक विठ्ठल मोरे यांना विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान केली आहे. जागतिक स्तरावरील साहित्यिकांच्या कलाकृतींमधून समाजातील वंचित घटकांचे वास्तव आणि प्रश्न प्रभावीपणे मांडणाऱ्या संशोधनासाठी त्यांना ही पदवी बहाल करण्यात आली. प्रा. मोरे यांनी The Voice of the Marginalized as Reflected in Selected Works of Aravind Adiga and Amitav Ghosh या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात शोधप्रबंध सादर केला होता. या संशोधनामध्ये साहित्य हे केवळ कल्पनाविलास नसून समाजाचा आरसा असते, या संकल्पनेवर आधारित सखोल अभ्यास करण्यात आला आहे.अरविंद अडिगा आणि अमिताव घोष या नामवंत लेखकांनी आपल्या साहित्यकृतींमधून समाजातील उपेक्षित, वंचित आणि कष्टकरी वर्गाचे जीवन अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे. त्यांच्या साहित्यामधून प्रतिबिंबित होणाऱ्या सामाजिक वास्तवाचे आणि वंचितांच्या संघर्षाचे चिकित्सक विश्लेषण प्रा. मोरे यांनी आपल्या संशोधनात केले आहे. या संशोधन कार्यासाठी प्रा. मोरे यांना डॉ. बाळाजी नाटकरे तसेच आयएएससीचे संस्थापक डॉ. अशोक थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. नुकत्याच पार पडलेल्या तोंडी परीक्षेस प्रा. संजय झगडे हे चेअरमन म्हणून उपस्थित होते, तर आसाम येथील मीना शर्मा यांनी बाह्य परीक्षक म्हणून काम पाहिले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे कनगर मध्ये आज लोकार्पण

**पाथर्डी । वीरभूमी-**

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते कनगर (ता. राहुरी) येथे उभारण्यात आलेल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याचे लोकार्पण करण्यात येणार आहे. सामाजिक समतेचा संदेश देणारा हा सोहळा १४ मे रोजी सायंकाळी ७ वाजता उत्साहात पार पडणार असून, या कार्यक्रमाला विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात ना. रामदास आठवले यांची सलग तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवड झाल्याबद्दल त्यांचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. तसेच राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत मोठ्या मताधिक्याने विजय मिळविल्याबद्दल आमदार अक्षय कर्डिले यांचाही विशेष सत्कार करण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी राज्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची प्रमुख उपस्थिती म्हणून राहणार आहेत. याशिवाय भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील व माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्यासह रिपब्लिकन पक्षातील अनेक राज्य कार्यकारिणीचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहे. या सोहळ्यास जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांनी केले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, संविधान मूल्ये आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# संजीवनीच्या ३० विद्यार्थ्यांना विसेन इन्फोटेकमध्ये नोकरी

### ‘संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेज म्हणजे हमखास चांगल्या पगाराची नोकरी’ हे समीकरण पुन्हा अधोरेखित

**कोपरगाव । वीरभूमी -**

संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजच्या तब्बल ३० विद्यार्थ्यांची विसेन इन्फोटेक या बहुराष्ट्रीय कंपनीत निवड झाली आहे. जागतिक स्तरावर आयटी सेवा व सॉफ्टवेअर सोल्युशन क्षेत्रात कार्यरत असलेल्या या नामांकित कंपनीने विद्यार्थ्यांना आकर्षक वेतन पॅकेजची ऑफर दिली आहे. संजीवनीच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने विकसित केलेल्या प्रभावी ‘प्लेसमेंट मॉडेल’मुळे विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे ‘संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश म्हणजे हमखास चांगल्या पगाराची नोकरी’ हे समीकरण अधिक दृढ झाले आहे.

ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाकडून नामांकित कंपन्यांच्या व्यवस्थापनाशी सातत्याने संपर्क ठेवला जातो. उद्योग क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येते तसेच अभ्यासक्रमातही आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश केला जातो. त्यामुळे कंपन्यांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ संजीवनीमध्ये उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांना प्राधान्याने नोकरीच्या संधी मिळत आहेत.



विसेन इन्फोटेक कंपनीने कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील हर्ष बढे, रोहित बारगळ, निकित भोगे, हिमांशू छाजेड, ईश्वरी देशमुख, दिपक काळे, कल्याणी कर्डे, अक्षय पेटकर; इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभागातील श्रेयश भागवत, निकिता भोर, सर्वेश्वर भुजाडे, प्रतिक बुलकुंडे, महेश दहे, भक्ती इमले, वैष्णवी जगताप, संज्योत काकडे, श्रेयश घोडके, शुभम कासार, यश खेडकर, स्वरूप मगर, पूनम मंडलिक, ऋतुजा राजपूत, तेजस्विनी फासले; तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील कुणाल देहरकर, धनश्री गाडे, प्रज्ञा जगताप, भूमी नरोडे, ओम लोखंडे, मुस्तीफा कुरेशी आणि अनेरी ठाणगे यांची निवड केली आहे.

संजीवनीचे अध्यक्ष श्री. नितीनदादा कोल्हे यांनी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. मॅनेजिंग ट्रस्टी श्री. अमित कोल्हे यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार केला. यावेळी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाची संपूर्ण टीम तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

### ‘संजीवनीमुळे माझे करिअर घडले’ : स्वरूप मगर

मी कोपरगाव तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील मुलगा आहे. विसेन इन्फोटेक ही आयटी व सॉफ्टवेअर क्षेत्रातील नामांकित कंपनी आहे. अंतिम वर्षातील ‘आयओटी बेस्ड सॉफ्टवेअर फॉर लायब्ररी युजेस’ या प्रोजेक्टमुळे मला या निवड प्रक्रियेत मोठी मदत झाली. यापूर्वी माझ्या बहिणीचे करिअरही संजीवनीमुळे घडले आणि आता माझेही स्वप्न पूर्ण झाले. आई-वडिलांचे स्वप्न साकार झाले आहे. संजीवनी शैक्षणिक संकुलातील व्यवस्थापन, डायरेक्टर, विभागप्रमुख आणि शिक्षकांनी माझ्यात रुजवलेले गुण माझ्या करिअरसाठी अत्यंत उपयुक्त ठरले, अशी भावना विद्यार्थी स्वरूप मगर यांनी व्यक्त केली.

## राहुरीत तीन ठिकाणी मटक्यावर कारवाई; तिघे ताब्यात

**राहुरी । वीरभूमी-**

राहुरी पोलिसांनी राहुरी शहरातील अवैध धंद्यांविरोधात धडक मोहीम उघडली असून, तीन वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करत कल्याण मटका चालविणाऱ्या तिघांना ताब्यात घेतले आहे.

पहिली कारवाई भाजी मंडई परिसरात करण्यात आली. येथे पत्र्याच्या टपरीच्या आडोशाला बसून कल्याण मटका खेळवत असलेला विजय अशोक सरोदे (वय ३०, रा. राहुरी) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून ३२० रुपये रोख रक्कम, पेन, कार्बन आणि मटका आकडे लिहिलेल्या चिठ्ठ्या जप्त करण्यात आल्या.

दूसरी कारवाई बसस्थानका जवळील मल्हारवाडी चौक परिसरात करण्यात आली. येथे संशयास्पद हालचाली करत असलेल्या बाळासाहेब रामचंद्र काळे (वय ३८, रा. टाकळीमियाँ) याच्याकडे चौकशी केली असता तो कल्याण मटका चालवत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याच्याकडून ३१० रुपये रोख रक्कम तसेच मटका साहित्य जप्त केले. तिसरी कारवाई देखील मल्हारवाडी चौक परिसरात करण्यात आली. येथे पत्र्याच्या टपरीच्या आडोशाला मटका खेळवित असलेला संतोष जगन्नाथ वाणी (वय ४२, रा. राहुरी बु.) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून ३२५ रुपये रोख रक्कम, मटक्याच्या चिठ्ठ्या, पेन आणि कार्बन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वरील तिन ही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर कारवाई पो.नि. संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स.फौ. तुळशीराम गिते, पो. हे.कॉ. विजय नवले, नदिम शेख आणि पो.कॉ. जयदीप बडे यांनी दोन पंचांसह पथक तयार करून शहरातील तीन ठिकाणी छापेमारी करत मटका घेणाऱ्या तीघांना ताब्यात घेतले.

## शासकीय दाखल्यांच्या विलंबामुळे पारनेरमध्ये संताप

### तहसील कार्यालयावर शुक्रवारी आंदोलनाचा इशारा

**पारनेर । वीरभूमी-**

दहावी आणि बारावीच्या निकालानंतर पुढील प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांची लगबग सुरू झाली असताना पारनेर तहसील कार्यालयातून शासकीय दाखले मिळण्यात होत असलेल्या दिरंगाईमुळे विद्यार्थी आणि पालक त्रस्त झाले आहेत. प्रशासनाने तातडीने यावर तोडगा न काढल्यास येत्या शुक्रवारी तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा भाजपचे मंडल सरचिटणीस कल्याण रामदास थोरात यांनी दिला आहे.

गेल्या पंधरा दिवसांपासून राज्यातील ‘सेतू’ प्रणालीचे सर्व्हर वारंवार बंद पडत असल्याने दाखल्यांचे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित काम साचले आहे. त्यातच पारनेर तहसील कार्यालयातील नियोजनाचा अभावही समोर येत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दाखले मंजुरीची जबाबदारी नायब तहसीलदार किसवे यांच्याकडे देण्यात आली असल्याचे समजते. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी अद्याप ‘डिजिटल थंब’ प्रणाली सुरू केलेली नसल्याने शेकडो अर्ज मंजुरीच्या प्रतीक्षेत अडकून पडले आहेत, अशी माहिती प्रशासकीय सूत्रांकडून मिळत आहे.

दाखले वेळेत मिळत नसल्याने अनेक सेतू केंद्र चालक हतबल झाले असून काही ठिकाणी प्रक्रियेत त्रुटी असतानाही दाखले दिले जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेत कायदेशीर अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याची भीती कल्याण थोरात यांनी व्यक्त केली आहे.

प्रशासनाने या समस्येवर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. कामाचा ताण लक्षात घेता दाखले मंजुरीचे अधिकार दोन नायब तहसीलदारांमध्ये विभागून द्यावेत, रखडलेली कामे मार्गी लावण्यासाठी अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करावेत तसेच ‘थंब इम्प्रेशन’ची तांत्रिक प्रक्रिया तातडीने पूर्ण करून दाखले ऑनलाइन उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

### विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात



प्रशासनाच्या दिरंगाईमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात येत आहे. येत्या दोन दिवसांत दाखले वितरण प्रक्रिया सुरळीत झाली नाही, तर शुक्रवारी तहसील कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

**- कल्याण रामदास थोरात,** मंडल सरचिटणीस, भाजपा, पारनेर

# एमआरपीच्या नावाखाली ग्राहकांची लूट थांबवा

### अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचा २५ मे रोजी जंतर-मंतरवर राष्ट्रीय मोर्चा

**अकोले । वीरभूमी-**

उत्पादन खर्चापेक्षा अनेक पटीने जास्त छापील किंमत (एमआरपी) आकारून कंपन्यांकडून सुरू असलेल्या ग्राहकांच्या कथित लुटीविरोधात अखिल भारतीय ग्राहक पंचायत आता राष्ट्रीय स्तरावर आक्रमक झाली आहे. या मागणीसाठी येत्या २५ मे रोजी जंतर-मंतर येथे भव्य राष्ट्रीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अकोले येथे नायब तहसीलदार लोहरे यांना ग्राहक पंचायतीच्या वतीने सविस्तर निवेदन देण्यात आले.

सध्या बाजारपेठेत विक्री होणाऱ्या वस्तूंवर केवळ अंतिम विक्री किंमत म्हणजेच एमआरपी छापलेली असते. मात्र, त्या वस्तूचा प्रत्यक्ष उत्पादन खर्च किती आहे, याची माहिती ग्राहकांना दिली जात नाही. याचाच फायदा घेत अनेक कंपन्या अवाजवी नफा कमावत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. त्यामुळे प्रत्येक वस्तूवर एमआरपीसोबत उत्पादन खर्च छापणे बंधनकारक करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

येत्या २५ मे रोजी देशभरातील ग्राहक प्रतिनिधी दिल्लीत एकत्र येणार असून, जंतर-मंतर येथील मोर्चातून केंद्र सरकारवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. वस्तूंच्या किंमतीबाबत पारदर्शकता आणण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याची मागणी या आंदोलनातून करण्यात येणार आहे.

अकोले तालुका शाखे नेही या आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवत तालुका प्रशासनामार्फत केंद्र सरकारपर्यंत आपली भूमिका पोहोचवली आहे. वस्तूंच्या किमतीतील पारदर्शकता हा ग्राहकांचा मूलभूत अधिकार आहे. उत्पादन खर्च समोर आल्याशिवाय मनमानी नफेखोरी थांबणार नाही, अशी भावना संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

जिल्हाधिकाऱ्यांनी या निवेदनाची गंभीर दखल घेत ते केंद्र सरकारकडे तातडीने पाठवण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे एमआरपीच्या नावाखाली होत असलेल्या कथित लुटीविरोधात आता मोठी जनचळवळ उभी राहत असल्याचे चित्र आहे.



११ मे रोजी जिल्ह्या-तील सर्व तालुक्यांत ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन देऊन एमआरपी कायद्यात सुधारणा करण्याची मागणी केली. यावेळी अशोकराव उगले, दिनेश थोरात, हरिभाऊ फापाळे, संदीप उगले आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पारनेरच्या वीज प्रश्नांवर मुंबईत उच्चस्तरीय बैठक

## धोत्रे येथील २२० के.व्ही. उपकेंद्राला गती । बाभुळवाडा ट्रान्सफॉर्मर क्षमतावाढीचे तातडीचे आदेश

**• पारनेर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्यातील वाढत्या वीज समस्यांबाबत आमदार काशिनाथ दाते यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत तालुक्यातील कमी दाबाचा वीजपुरवठा, लांब पल्ल्याच्या ३३ के.व्ही. वाहिन्या, अपुरी ट्रान्सफॉर्मर क्षमता तसेच नवीन उपकेंद्र उभारणी या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीला महापारेषण संचालक सतीश चव्हाण, कार्यकारी संचालक धनंजय औडेकर, अधीक्षक अभियंता (प्लॅनिंग) दाभरडे, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण आदी अधिकारी उपस्थित होते.

सध्या पारनेर तालुक्यात सुपा व बाभुळवाडा येथे १३२ के. व्ही. उपकेंद्रे कार्यरत आहेत. तसेच केडगाव (जि. अहिल्यानगर), शिरूर आणि आळेफाटा (जि. पुणे) येथून विविध ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांना वीजपुरवठा केला जातो. मात्र, अनेक वाहिन्यांची लांबी ४० ते ५० किलोमीटरपर्यंत असल्याने कमी दाबाने वीजपुरवठा, वारंवार तांत्रिक बिघाड आणि दुरुस्तीसाठी होणारा विलंब यामुळे ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे आमदार दाते यांनी बैठकीत निदर्शनास आणून दिले.

आळेफाटा येथून येणाऱ्या ३३ के. व्ही. वाहिनीवर अळकुटी, आणे, पळसपूर व वारणवाडी अशी चार उपकेंद्रे जोडलेली असून या वाहिनीची लांबी सुमारे ५० कि.मी. आहे. तसेच बाभुळवाडा येथून निघणाऱ्या सहा वाहिन्यांवर कान्हूर पठार, टाकळी ढोकेश्वर व निघोज परिसरातील प्रत्येकी दोन उपकेंद्रे जोडलेली आहेत. केडगाव येथून येणाऱ्या वाहिनीवर भाळवणी, गोरेगाव व ढवळपुरी ही उपकेंद्रे जोडलेली असून वाहिन्यांचे अंतर जास्त असल्याने वारंवार अडचणी निर्माण होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

वडगाव सावताळ–वनकुटे परिसरातील नवीन सबस्टेशनच्या मागणीबाबतही बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. संबंधित प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना देत त्यावर लवकरच कार्यवाही केली जाईल, असा विश्वास मंत्री बोर्डीकर यांनी व्यक्त केला. तसेच खडकवाडी व अळकुटी येथे नवीन सेक्शनच्या मागणीवर ग्राहकसंख्येचा आढावा घेऊन निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



दरम्यान, बाभुळवाडा येथील १३२ के.व्ही. उपकेंद्रात कार्यरत असलेल्या २५ चत– क्षमतेच्या दोन पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढवून प्रत्येकी ५० चत– करण्यास मंजुरी मिळालेली असतानाही अंमलबजावणी रखडल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले. यावर मंत्री बोर्डीकर यांनी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

तसेच आरडीएसएस (ठऊडड) योजनेंतर्गत सुरू असलेल्या कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईवर नाराजी व्यक्त करत संबंधित ठेकेदारांना कामे जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

> धोत्रे येथे मंजूर असलेल्या नवीन २२० के.व्ही. उपकेंद्राची तातडीने उभारणी होणे आवश्यक आहे. हे उपकेंद्र कार्यान्वित झाल्यास प्रत्येक ३३/११ के.व्ही. उपकेंद्राला स्वतंत्र वाहिनीद्वारे वीजपुरवठा करता येईल. त्यामुळे कमी दाब, वारंवार खंडित होणारा पुरवठा आणि तांत्रिक बिघाडाच्या समस्यांपासून मोठा दिलासा मिळेल, असे ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक बदल करून प्रस्तावित उपकेंद्राचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
>
> **– आ. काशिनाथ दाते,**
> विधानसभा सदस्य

या बैठकीमुळे पारनेर तालुक्यातील दीर्घकालीन वीज समस्यांच्या निराकरणाला गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अहिल्यानगर येथील सामुदायिक पसायदान गायन व भजन उत्सवाला उपस्थित रहा

## महंत भास्करगिरी व उद्धव महाराज मंडलिक यांचे आवाहन

**• नेवासा । वीरभूमी–**

भारतीय आध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त दि. १५ मे रोजी सायंकाळी ६:३० वाजता अहिल्यानगर शहरातील बंधन लॉन्स येथे आर्ट ऑफ लिव्हिंग अहिल्यानगर जिल्हा परिवार, वारकरी सांप्रदाय व धार्मिक–सामाजिक क्षेत्रातील भाविकांनी विश्वशांतीसाठी आयोजित केलेल्या सामुदायिक पसायदान गायन व स्वरमयी भजन उत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री क्षेत्र देवगडचे महंत भास्करगिरी महाराज व सद्गुरु नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी केले आहे.

भाविकांना आवाहन करताना भास्करगिरी महाराज म्हणाले, संत कोणत्या जातीचा, पंथाचा, परिसराचा किंवा देशाचा नसतो. विश्वातील सर्वांचे कल्याण व्हावे, दुःखी कोणी असू नये हिच सर्व संतांची भावना असते. भारत भूमी ही संतभूमी, तीर्थभूमी आणि देवभूमी आहे, हा त्रिवेणी संगम हा फक्त भारतातच पाहायला मिळतो. त्यातीलच एक गुरुदेव श्री श्री रविशंकर महाराज आहेत. अंतकरणातील सद्भाव, समाजसेवा, इशसेवा हेच त्यांच्या कार्यातून पाहायला मिळत आहे.

त्यांच्या जन्मोत्सवानिमित्त अहिल्यानगर शहरात पसायदान सामूहिक गायन व स्वरमयी भजन उत्सव मोठ्या आनंदात आणि उत्सहात पार पडणार आहे. संगीत आपल्याला अंतर्मुख करत असते आणि मन स्थिर होण्यासाठी मदत करते, असा हा मोठा पसायदानाचा कार्यक्रम सर्व जाती धर्मातील बांधवांना बरोबर घेऊन श्रद्धेने या कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

उद्धव महाराज मंडलिक म्हणाले की, अहिल्यानगर शहरात आर्ट ऑफ लिविंग परिवार, वारकरी संप्रदायाच्या वतीने एकत्र येऊन श्री श्री रविशंकर गुरुजी यांच्या ७० व्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून नेवासा येथे प्रकट झालेल्या ज्ञानेश्वरी ग्रंथ व त्यात ज्ञानेश्वर माऊलींनी विश्वशांतीसाठी मागितलेल्या पसायदानाचे सामूहिक गायन करण्यात येणार आहे. जवळपास ११ हजार नागरिक भाविक एकत्र येऊन एकसुरात पसायदान गायन करणार आहेत. भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमासाठी आंतरराष्ट्रीय किर्तीचे भजन गायक विक्रम हाजरा यांची विशेष उपस्थिती लाभणार असल्याची माहिती संयोजकांनी दिली.

### भारती शेवते यांची 'वन्यजीव रक्षक' पदी नियुक्ती

**• अहिल्यानगर । वीरभूमी–**

जंगलातील मूक प्राण्यांच्या संरक्षणासाठी अनेक वर्षे जीवाची पर्वा न करता संघर्ष करणाऱ्या भारती अनिल शेवते यांना महाराष्ट्र शासनाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'मानद वन्यजीव रक्षक'म्हणून अधिकृत नियुक्ती दिली आहे. विशेष म्हणजे, या जबाबदारीवर नियुक्त होणाऱ्या त्या जिल्ह्यातील पहिल्या महिला ठरल्या आहे. वनविभाग कार्यालयात उपवनसंरक्षक सौ. अश्विनी दिघे यांच्या हस्ते भारती शेवते यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी तेलोरे, शिरसाठ, वनविभागाचे अधिकारी–कर्मचारी, तसेच निसर्ग भ्रमंती ग्रुपचे विद्यासागर पेटकर आणि निसर्गप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जखमी वन्यजीवांचे रेस्क्यू, शिकारींवर नजर, वन्यजीव गुन्ह्यांची माहिती प्रशासनापर्यंत पोहोचवणे, तसेच नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करणे या क्षेत्रात भारती शेवते गेल्या अनेक वर्षांपासून सक्रियपणे कार्यरत आहेत.

# शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी मुंबई मंत्रालयावर मोर्चा

## सरसकट कर्जमाफी व कांद्याला ४० रुपये प्रतिकिलो भावाची मागणी

**• निघोज । वीरभूमी–**

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी तसेच कांद्याला प्रतिकिलो ४० रुपये दर मिळावा या प्रमुख मागण्यांसाठी आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेच्या वतीने लवकरच मुंबई मंत्रालयावर शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण यांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या या मोर्चात शिरूर आणि पारनेर तालुक्यातील सुमारे ५०० शेतकरी सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या आंदोलनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचाही पाठिंबा मिळत असून मोर्चा हजारोंच्या संख्येने होणार असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढे यावे, असे आवाहन रुपेश ढवण यांनी केले आहे.



फडणवीस सरकारने शेतकऱ्यांनाकर्जमाफीचेआश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना दिलासा मिळालेला नाही. आज शेतमालाला योग्य भाव मिळत नसून कांदा मातीमोल दराने विकला जात आहे. कांदा उत्पादनासाठी प्रति हेक्टर दीड लाख रुपयांपर्यंत खर्च येत असताना सध्याच्या बाजारभावामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. त्यामुळे शेतकरी अधिकाधिक कर्जबाजारी होत असल्याची खंत ढवण यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे कोणताही राजकीय पक्ष गांभीर्याने पाहत नाही. त्यामुळे कोणत्याही पक्षाचा आधार न घेता आम्ही सर्व शेतकऱ्यांना एकत्र करून मंत्रालयावर मोर्चा काढणार आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या आंदोलनात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ता उनवने, पसायदान सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र महाराज सुपेकर, उत्तम लामखडे, पवन महाराज तनपुरे, प्रकाश वाघ, देवराम बुवा लामखडे, गणेश कवाद, ग्रामपंचायत सदस्य योगेश वाव्हळ, संदीप ढवळे, बाबाजी पठारे, राजेंद्र वाळुंज, दादा पाटील वराळ, बाळासाहेब लंके, गोपीनाथ रसाळ, अक्षय भाकरे, आशुतोष भुकन, अजय दावभट, संतोष थोरात, संतोष लामखडे, शंकर डोकडे आदींशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कासार पिंपळगाव ग्रामपंचायतीची पंचायतराज पथकाकडून पाहणी

**• पाथर्डी । वीरभूमी–**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये सहभाग घेतलेल्या तालुक्यातील कासार पिंपळगाव ग्रामपंचायतीची अंबेजोगाई येथील पंचायत समितीच्या पथकाने पाहणी केली. यामुळे ग्रामस्थांनी टाळमृदुंगाच्या गजरात केलेल्या स्वागताने पथकातील अधिकारी भारावून गेले. पथकाने गावातील विकासकामांची पाहणी करुन समाधान व्यक्त केले.

कासार पिंपळगावाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सहभाग घेत लोकसहभागातून विविध विकासकामे केली. या अभियानातंर्गत अंबेजोगाई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तथा समिती अध्यक्ष कैलास बळवंत, विस्तार अधिकारी अशोक सावध, तालुका मुल्यमापन समिती सदस्य राहुल दुबे, अक्षय कांबळे, विस्तार अधिकारी रानमळ, गिऱ्हे साहेब, दादासाहेब शेळके, राम राजळे आदी उपस्थित होते.

समितीचे स्वागत सरपंच तथा प्रशासक मोनालीताई राजळे, ग्रामविकास अधिकारी प्रमोद म्हस्के, प्रशासक समिती व ग्रामस्थांनी स्वागत केले. यावेळी उभारलेली स्वागत कमान व रस्त्याच्या दुतर्फा लावण्यात आलेली वृक्ष व फुलझाडे, छोट्या पुलावर उभारलेला आकर्षक कठडा पाहुन समिती सदस्यांनी समाधान व्यक्त केले. तेथून समिती गावात दाखल होताच टाळ मृदुंगाच्या गजरात व फुलांची उधळण करत स्वागत करण्यात आले.

विठ्ठल–रुख्मिणी मंदिरासमोर काढलेल्या आकर्षक भव्य अशा रांगोळीने मनमोहक वातावरण झाले. मंदिराच्या सभामंडपात समिती सदस्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच मोनालीताई राजळे यांनी प्रास्ताविकात सागितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरु केलेल्याने गावागावांत एकोपा निर्माण झाला आहे. सरपंच पदाच्या काळाच्या लोकसहभाग व आ. मोनिकाताई राजळे यांच्या सहकार्याने अनेक पथदर्शी विकासकामे करुन गावात बदल घडविला आहे. या अभियानाच्या माध्यमातून गावाचे रुप बदलले. यापुढेही एकजुटीने असेच विकासकामे करुन जिल्हास्तरावरही चांगले काम करु, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शेळीपालन करणाऱ्या महिला बचतगटांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी सर्व ग्रामस्थ, महिला, तरुण उपस्थित होत्या.



यावेळी समिती प्रमुख तथा अंबेजोगाईचे गटविकास अधिकारी कैलास बळवंत यांनी ग्रामस्थांनी केलेले स्वागत व विकासकामे पाहुन समाधान केले. समितीने रस्त्याच्या दुतर्फा लावण्यात आलेली वृक्ष, फुलझाडे, ग्रामपंचायत इमारत, बंदिस्त गटार योजना, घनकचरा प्रकल्प, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक मंच, अमरधाम, प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, सार्वजनिक वाचनालय, व्यायामशाळा, राजीव राजळे उद्यान, ग्रामपंचायतीचे जमा–खर्च दप्तर, शुद्ध पाणीपुरवठा, सोलर प्रकल्प, स्वच्छता यासह गावात राबविलेल्या विविध योजना व विकासकामे यांचे मुलयमापन करुन आपला अभिप्राय नोंदवला.

तत्पुर्वी आमदार मोनिकाताई राजळे यांनी समितीच्या अगोदर गावात येवून केलेली विकासकामे यांची पाहणी करुन समाधान व्यक्त केले.